## महाबळमधील पथदिवे बंद

**जळगाव ।** शहरातील महाबळ परिसरातील पथदिवे गेल्या दोन दिवसांपासून बंद आहेत. त्यामुळे रात्री रस्त्यावर अंधार पसरलेला दिसून येत आहे. बऱ्याचवेळा पथदिवे हे दिवसा चालू राहतात आणि रात्री बंद राहत असल्याने नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तरी महापालिकेने याबाबत त्वरीत दखल घेऊन पथदिवे सुरू करावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

जाहिरात कात्रण आणल्यास विशेष सूट
भारतातील प्रसिद्धीप्राप्त गुप्तरोग चिकित्सक
लैंगीक समस्या, गुप्तरोग
शीघ्रपतन, नपुसंकता, मुल न होणे, शुक्राणूंची कमी आणि मधुमेहाने आलेल्या कमजोरीवर कमी दिवसात खात्रीशीर इलाज केला जाईल.
(टीपः रुग्णालयात येण्याआधी फोन करुन अपॉईंटमेंट घ्यावी.)
(EMD) नकली डॉक्टर केंद्रोंसे सावधान
डॉ.मंशा डिस्पेन्सरी
प्रकाश टॉकीजमागे, बऱ्हाणपूर (म.प्र.) (कॉम्प्युटराईज्ड)
०७३२-५२५१४५९. मोबा.९८२६२७८८७१

भोंदू वैद्यांपासून सावध रहा! । रुग्णालय दररोज सुरु असते. वेळ सकाळी ११ ते रात्री ९
(आपला पत्रव्यवहार किंवा उपचाराची माहिती गुप्त ठेवली जाईल.)





# 36 ग्रामपंचायतींचे महिलांकडे नेतृत्व

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव तालुक्यातील ग्रामपंचायतच्या सरपंचपदाच्या आरक्षण सोडती तहसीलदार शितल राजपूत यांच्या उपस्थितीमध्ये सोमवारी दि. २१ एप्रिल रोजी काढण्यात आल्या. यावेळी अनेक राजकीय कार्यकर्त्यांची उपस्थिती दिसून आली. आरक्षण सोडतीमध्ये अनुसूचित जातीसाठी ६, अनुसूचित जमातीसाठी १७, ओबीसी साठी ११ तर खुल्या संवर्गासाठी ३५ आरक्षण काढण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेच्या सानेगुरूजी सभागृहात झालेल्या या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमाला तालुकानिहाय सभेला तहसीलदार शितल राजपूत, तहसीलदार राहुल वाघ, गटविकास अधिकारी सरला पाटील, म्हसावदचे मंडळ अधिकारी अजिंक्य आंधळे, विस्तार अधिकारी धीरज बढे, महसूल सहाय्यक अश्विनी कोळी-वाघ, महसूल सहाय्यक गंगाधर सोनवणे उपस्थित होते.



अनुसूचित जाती -कुसुंबे खुर्द, उमाळे, मन्यारखेडा, अनुसूचित जमाती- पाथरी, सुभाषवाडी, रामदेव वाडी, डिक्साई, नांद्रा खुर्द, भोकर, तुरखेडा, सावखेडा खुर्द, कठोरा, यांचा समावेश आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग - असोदा, धामणगाव, धानवड, फूपनगरी, घार्डी, कुवारखेडे, फुपणी, रायपूर, रिधुर, शेळगाव, वावडदे. सर्वसाधारण प्रवर्ग- यामध्ये आमोदे बु.,आव्हाणे, भादली खुर्द, बोरनार, देऊळवाडा, डोमगाव, जामोद, कडगाव, कंडारी, करंज, लमांजन, लोणवाडी बुद्रुक, पळसोद, पिलखेडा, सावखेडा बुद्रुक, वराड बुद्रुक, विटनेर यांचाही सर्वसाधारण प्रवर्ग आरक्षणात समावेश आहे.

### असे आहे महिला आरक्षण

अनुसूचित जाती (महिला)- ममुराबाद, वडली, वसंतवाडी अनुसूचित जमाती (महिला)- विदगाव, तरसोद, म्हसावद, निमगांव बु., धानोरे बु., नंदगाव, खेडी खु., नांद्रे बु., तूरखेडे, नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)- धामणगाव, धानवड, कुवारखेडे, शेळगाव, वावडदे, रिधुर, सर्वसाधारण महिला- शिरसोली प्रबो, बेळी, आवार, बिलवाडी, जळगाव खु., चिंचोली, वडनगरी, किनोद, भादली बु, जळके, गाढोदे, पिलखेडे, जवखेडे, दापोरे, मोहाडी, कानळदे, भोलाणे, शिरसोली प्र.न.

## तूर खरेदीला ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**जळगाव । प्रतिनिधी**

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दराने (हमीभाव) नाफेड अंतर्गत २०२४-२५ हंगामातील तूर खरेदीसाठी जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी नोंदणीला मुदतवाढ देण्यात आली आहे. आता शेतकरी ३० एप्रिलपर्यंत ऑनलाइन नोंदणी करू शकतात.

जिल्ह्यातील अमळनेर, पारोळा, चोपडा, धरणगाव, कासोदा, म्हसावद, जळगाव, भुसावळ, यावल, रावेर, मुक्ताईनगर, बोदवड, जामनेर, पाचोरा, भडगाव आणि चाळीसगाव अशा एकूण १६ खरेदी केंद्रांवर ही नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. तुर खरेदीच्या ऑनलाईन नोंदणीसाठी अंतिम तारीख ३० एप्रिल २०२५ आहे. तर खरेदीचा कालावधी १३ फेब्रुवारी २०२५ ते १३ मे २०२५ दरम्यान असणार आहे. तुर हमीभाव ७५५० रुपये प्रति क्विंटल इतका आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधारकार्ड, बँक पासबुक, ऑनलाइन पीकपेरा नोंद असलेला ७/१२ उतारा आणि ८ अ ही कागदपत्रे घेऊन जवळच्या खरेदी केंद्रावर नोंदणी करावी, असे आवाहन विभागीय संचालक मंत्री संजय सावकारे, उपाध्यक्ष रोहित निकम, संचालक संजय पवार यांनी केले आहे.

## महाविहार मुक्ती आंदोलनात कार्यकर्ते सहभागी होणार

### जिल्ह्यातून १0,000 सह्यांचे निवेदन

**जळगाव । प्रतिनिधी**

बुद्ध गया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी बुद्ध गया येथे दिनांक १२ फेब्रुवारी पासून बौद्ध भिक्खू आंदोलन करीत आहेत .



या आंदोलनात जळगाव येथील १७ कार्यकर्ते २३ एप्रिल रोजी प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत अशी माहिती साहित्यिक जयसिंग वाघ यांनी दिली. जळगाव जिल्ह्यातून १०००० सह्यांचे निवेदन बिहारचे मुख्यमंत्री, राष्ट्रपती, प्रधानमंत्री, विरोधी पक्षनेते यांना २१ एप्रिल रोजी पाठविण्यात आले. दिनांक २३ एप्रिल रोजी गया येथील जिल्हाधिकारी तसेच महाबोधी महाविहार समितीचे अध्यक्ष तसेच आंदोलनाचे प्रमुख भांतेजी यांना प्रत्यक्ष भेटून त्यांना निवेदन देणार आहेत. त्यानंतर प्रत्यक्ष आंदोलन स्थळी सहभागी होणार आहेत.

जयसिंग वाघ यांचे समवेत ॲड. आनंद कोचुरे, राजुभाई मोरे, बाबुराव वाघ, दिलीप तासखेडकर, अशोक सैंदाणे, नथु अहिरे, चंद्रशेखर अहिरराव, प्रा. डॉ. सत्यजित साळवे, शरद भालेराव, रंगकर्मी उदय सपकाळे, सुभाष वाघ, डी. झेड. मोरे, डॉ. सी. यू. भालेराव, हरिश्चंद्र सोनवणे, रामभाऊ शिरसाठ, विनोद रंधे, हे बुद्ध गया येथील आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत.


## एसपी कार्यालयात नातेवाईकांमध्ये फ्री-स्टाईल

**जळगाव । प्रतिनिधी**

दोन वर्षांपूर्वी लग्न झाल्यानंतर पती-पत्नीमध्ये वादविवाद होऊ लागल्याने ते सोडवण्यासाठी महिला दक्षता कक्ष या ठिकाणी आज पहिल्याच तारखेला पती-पत्नी व नातेवाईक आल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातच नातेवाईकांमध्ये हाणामारी झाली. यावेळी पोलिसांनी मध्यस्थी करून वाद सोडविला. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार जळगाव शहरातील डी मार्ट येथे मिसबा अकीब ही विवाहिता राहत असून तिचा विवाह चाळीसगाव येथील चेअरमन या व्यक्तीशी दोन वर्षांपूर्वी झाला होता.

दोन्ही पती-पत्नीमध्ये दोन वर्षांमध्ये वाद-विवाद होऊ लागले. हा वाद विकोपाला गेल्यामुळे कौटुंबिक समजवण्यासाठी महिला दक्षता या ठिकाणी अर्ज करण्यात आलेला होता. आज पहिल्याच तारखेला दुपारी दोन ते अडीच वाजेच्या सुमारास दोन्ही कडील मंडळी समोरासमोर आल्यानंतर एकमेकांना शिवीगाळ व मारहाण करण्यात आली. यामुळे काही काळ वातावरण तणावाचे झाले होते. एकमेकांवर महिलांसह मारहाण होऊ लागल्याने पळापळ झाली. शेवटी पोलिसांनी मध्यस्थी केल्यानंतर मुलाकडील व मुलीकडील मंडळी बाहेर जाऊन थेट जिल्हापेठ पोलीस स्टेशन गाठले. जिल्हा पोलीस स्टेशन शी संपर्क साधल दोन्ही कडून पोलीस स्टेशनला परस्परांविरुद्ध तक्रार देण्याचे काम सुरू होते.

### वाढदिवस शुभेच्छा



**बाबुराव गवळी**
मा.सभापती
पं.स.जामनेर

मान्यवरांच्या वाढदिवसापूर्वी एक दिवस आधी हितचिंतकांनी खालील ई-मेल आयडीवर संपूर्ण नाव छायाचित्रासह माहिती पाठवावी.
cityjalgaon@gmail.com

## थोडक्यात...

### रेल्वे रुळाजवळ मृतदेह आढळला

**जळगाव ।** रेल्वे रुळानजीक एका ३० ते ३५ वर्षीय अनोळखीचा मृतदेह आढळून आला. सदर व्यक्तीचे शिर व एक हात धडापासून वेगळे झालेले आहे. ही घटना २० एप्रिल रोजी समोर आली. या प्रकरणी रामानंद नगर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोहेकॉ सुशील चौधरी करीत आहेत.

### गांजा ओढणाऱ्यावर कारवाई

**जळगाव ।** शहरातील पिंप्राळा हुडको परिसरात जुनेब शेख साबीर (रा. पिंप्राळा हुडको) हा दि. २० रोजी रात्री सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढतांना रामानंद नगर पोलिसांना मिळून आला. पोलिसांनी त्याच्यावर कारवाई करीत रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोहेकॉ जितेंद्र राठोड करीत आहे.

### रोटरी सेंट्रलतर्फे विद्यार्थ्यांसाठी पाण्याची सुविधा

**जळगाव ।** येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रलने गेल्या अठरा वर्षांपासून शैक्षणिक दृष्ट्या विकासासाठी दत्तक घेतलेल्या कानळद्याच्या जिल्हा परिषद मुलींच्या शाळेत १६५ लिटरचे स्वयंचलित वॉटर प्युरिफायर मशीन लोकार्पण करून कायमस्वरूपी शुद्ध आणि थंड पाण्याची सुविधा निर्माण केली आहे. रोटरी सेंट्रलचे माजी अध्यक्ष संतोष अग्रवाल यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र अंकुर अग्रवाल यांच्या हस्ते या प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी अध्यक्ष दिनेश थोरात, मानद सचिव समर्थसिंग पाटील, सरपंच पुंडलिक सपकाळे, मुख्याध्यापक राजू सोनवणे यांच्यासह अनेक माजी अध्यक्ष यांची प्रमुख उपस्थिती होती.



## हिंदीचा विरोध करण्यासाठी मनसेचे आंदोलन

**जळगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना जळगाव यांच्यातर्फे आज जिल्हा परिषद या ठिकाणी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पत्राचे बॅनर लावून आंदोलन करण्यात आले. यावेळी पदाधिकाऱ्यांकडून घोषणा देण्यात आल्या.

आंदोलनात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते माजी आमदार ॲड. जयप्रकाश बाविस्कर यांनी माध्यमाशी संवाद करताना सांगितले की आम्ही जळगाव जिल्ह्यामध्ये पहिली ते पाचवी हिंदी सक्तीकरण होऊ देणार नाहीत. तसेच प्रशासनाने आणि केंद्र सरकारने हिंदी पुस्तक पहिली ते पाचवी विद्यार्थ्यांना वाटप केल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना जळगाव जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत जाऊन आंदोलन करेल याची प्रशासनाने दखल घ्यावी असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान आंदोलन करतेवेळी जिल्हाध्यक्ष जमील देशपांडे, जिल्हाध्यक्ष अनिल वाघ, जिल्हाध्यक्ष मुकुंदा रोटे, महानगर अध्यक्ष विनोद शिंदे, किरण तळले, जिल्हा संघटक राजेंद्र निकम, महानगर संघटक श्रीकृष्ण मेंगडे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष योगेश पाटील, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## जळगावातील नाट्यगृहाजवळून दुचाकीची चोरी

**जळगाव । प्रतिनिधी**

बालगंधर्व नाट्यगृहाजवळ उभी केलेली अजितकुमार कपूरचंद पोरवार (६४. रा. गणेशवाडी) यांची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना १० एप्रिल रोजी घडली होती. या प्रकरणी पोरवार यांनी जिल्हापेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून २० एप्रिल रोजी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ अनिता वाघमारे करीत आहेत.



### स्वागत....



**जळगाव ।** आज जिजाऊ रथयात्रेचे आगमन झाले होते. यावेळी मराठा समाज बांधवांतर्फे या यात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी सुरेंद्र पाटील, सुरेश पाटील, एजाज मलिक आदी उपस्थित होते.

## विटनेरात एकाला चौघांकडून बेदम मारहाण; गुन्हा दाखल

**जळगाव । प्रतिनिधी**

चहाच्या हॉटेलवर बसलेले असतांना याला फार मस्ती आले असे म्हणत डिगंबर प्रभाकर काळे (वय ४०, रा. विटनेर, ता. जळगाव) याला चौघांनी बेदम मारहाण केली. तसेच त्यांनी लोखंडी सळईसह लाकडी काठीने मारहाण करुन गंभीर जखमी केले. ही घटना दि. १९ रोजी गावातील बस स्टॉपसमोर घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**बस स्टॉपवर घडली घटना**

जळगाव तालुक्यातील विटनेर येथील डिगंबर काळे हे दि. १९ रोजी गावातील बस स्टॉपजवळ असलेल्या चहाच्या दुकानात बसलेले होते. यावेळी सुशिल साबळे, भिकन साबळे, सौरव खडके व गौरव खडके हे चौघे तेथे आले. त्यांनी काळे यांना बघून याला फार मस्ती आली आहे असे म्हणत शिवीगाळ केली. यावेळी त्यांच्यातील वाद वाढतच गेल्याने सुशिल साबळे याने लोखंडी सळईने तर भिकन साबळे याने लाकडी काठीने त्यांना मारहाण केली. यामध्ये ते गंभीर जखमी झाले. त्यांनी एमआयडीसी पोलिसात तक्रार दिली. त्यानुसार चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोहेकॉ स्वप्निल पाटील करीत आहे.

## फिजिओथेरेपी महाविद्यालयात माजी विद्यार्थी संमेलन

### महाविद्यालयात मि. फ्रेशर्स अनमोल मनवानी तर मिस फ्रेशर्स आर्या सूर्यवंशी विजेते

**जळगाव । प्रतिनिधी**

माजी विद्यार्थी संमेलनाने महविद्यालय बहरले डॉ. उल्हास पाटील फिजिओथेरेपी महाविद्यालयात शनिवार ५ एप्रिल रोजी माजी विद्यार्थ्यांचे संमेलन उत्साहात झाले. माजी विद्यार्थ्यांच्या हास्याने आणि उत्साहाने महाविद्यालय परिसर फुलूनउठला होता. कार्यक्रमात विविध प्रकारचे मनोरंजक खेळ खेळण्यात आले तसेच माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालया प्रती आपले मनोगत व्यक्त करून महाविद्यालायातील शिक्षणाचा आणि अनुभवाचा अभिप्राय मांडला, आणि आपल्या जुन्या आठवणी पुनः नव्या करून घेवून गेले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत नगुलकर प्राशसकीय अधिकारी श्री. राहुल गिरी तसेच माजी विद्यार्थी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. रिजवान खाटीक, उपाअध्यक्षा डॉ. कल्याणी नगुलकर, सचिव डॉ. निखिल पाटील आणि इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचरी उपस्तीत होते. कार्यक्रमाचे संचालन ओजस्वी जनबंधू, आस्था पटेल यांनी तर आभार प्रदर्शन शुभम केंद्रे आणि ऋतूजा शारदुल यांनी केले.




### प्रथम पुण्यस्मरण



**कै. तुकडू गणपत घटे**

आयुष्य असे जगलात आपण की,
आजही आपला सहवास जाणवतोय,
जीवन पटलावर प्रत्येक क्षण,
आपल्यास्मृतीत विसावतोय

|| शोकाकुल ||
श्री संतोष तुकडु घटे (मा. चेअरमन वि.का.सो. कर्की)
श्री सुभाष तुकडु घटे (संचालक, मुक्ताई सुतगिरणी)
श्री कैलाश तुकडु घटे (पो. पा. कोठा)
समस्त घटे परिवार,
कोठा ता. मुक्ताईनगर जि.जळगाव